आर सी एफ
समृद्धीची एकत्र वाटचाल

# आर सी एफ शेती पत्रिका

कृषी समृद्धीची मार्गदर्शिका

शेतकऱ्यांच्या प्रथम पसंतीचे मासिक



वर्ष १४ अंक – ११ मुंबई मे २०२३ पाने – २४ किंमत ₹ ५/–



## सुगंधी वनस्पती विशेषांक

भाग–२

# कार्यकारी संचालक - विपणन यांचे मनोगत




पूर्वी हवामान बदल हा विषय आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये किंवा संशोधन संस्थांच्या चर्चासत्रांमध्ये चर्चिला जात असे. आज हा विषय शेतीच्या बांधावर पोहोचला आहे! निसर्गाने दिलेली विपुल संपन्नता आणि संसाधने यांचे संवर्धन करण्यात जर आपणास अपयश आले तर त्याचे दूरगामी परिणाम सर्वत्र दिसून येणार आहेत. जागतिक तापमानातील वाढ, जंगलातील वणवे, भुस्खलन, भूजलाची घटती पातळी ही याची काही उदाहरणे आहेत.

आपणास माहितच असेल की 'फ्रायडे फॉर फ्यूचर' या स्वीडन येथील हवामानविषयक चळवळीची संस्थापक ग्रेटा थनबर्ग हिने तेथील संसदेसमोर प्रभावी भाषण दिले होते. ''हवामान बदलाच्या लढाईत आज आपल्याला अपयश येत असले तरी अजूनही वेळ गेलेली नाही. आपण यावर मात करू शकतो.'' हा तिचा आशावादी विचार वास्तवाला धरूनच होता. तिच्या वक्तव्याने जगातील लाखो युवकांना प्रेरणा मिळाली आहे. या चळवळीने आता व्यापक स्वरूप धारण केले आहे. जे आता फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, यु–ट्यूब, ब्लॉग इत्यादी समाजमाध्यमातून व्यक्त होत असते.

आपल्या देशाचे भौगोलिक स्थान पाहता अति पर्जन्यमान, तापमानातील विविधता, उष्मलाटा, वादळे, पूरस्थिती आणि दुष्काळ विचार करायला लावणारे असते. या सर्व प्रश्नांना गांभीर्याने घेऊन येत्या काळात सर्वांनी अभ्यासपूर्वक सक्रिय भूमिका बजावणे काळाची गरज आहे. हवामान बदलावर मात करण्यासाठी आपणास आपल्या जीवनशैलीतही बदल करणे अपरिहार्य आहे. सद्यस्थितीत जैव विविधतात्मक वन लागवड आणि त्याचे संवर्धन, सौर आणि पवन उर्जेचा वापर, जैव इंधनाचा उपयोग, बायोगॅस इत्यादी स्त्रोतांकडे जास्त लक्ष द्यावे लागेल. जलसंवर्धनाचे प्रभावी उपाय योजावे लागतील. अन्नधान्याची, भाजीपाल्याची नासाडी टाळावी लागेल. पर्यावरण पूरक घटकांची निर्मिती आणि वापर वाढवावा लागेल. याबाबत सामाजिक प्रबोधन करण्यासाठी युवक–युवतींनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. आगामी काळात ही पर्यावरणात्मक लढाई युवावर्गालाच लढायची आहे ! कोणत्याही राष्ट्राच्या उभारणीत त्या देशातील तंत्रज्ञान, उद्योग आदी क्षेत्रातील प्रगतीबरोबरच यावर्गाची वैचारिक भूमिका आणि स्थिती महत्वाची असते.

मागील महिन्यात 'सुगंधी वनस्पती विशेषांक' (भाग–१) प्रसिद्ध करण्यात आला होता, शेतकऱ्यांच्या आग्रही मागणीमुळे या विशेषांकाचा (भाग–२) प्रसिद्ध करून आपल्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे, कारण आरसीएफ लि. कंपनी ने नेहमीच शेतकऱ्यांच्या सर्वांगीण कृषी विकासाचा आणि उत्कर्षाचा विचार केलेला आहे.

धन्यवाद.

सुनेत्रा कांबळे
कार्यकारी संचालक-विपणन

# अंतरंग



| | |
|---|---|
| ३-५ | आधुनिक तंत्रज्ञानाने मोगरा लागवड |
| ६-९ | पुदिना उत्पादन तंत्रज्ञान |
| १० | बासील - एक उपयुक्त सुगंधी वनस्पती |
| ११ | आरसीएफ विद्राव्य खत - सुजला १९:१९:१९ |
| १२-१३ | जपणूक आमची, सामाजिक बांधीलकीची... |
| १४ | आवश्यक सुगंधी तेल आणि त्यांचे फायदे |
| १६ | सुगंधी वनस्पती लागवडीच्या संधी आणि उत्पादन प्रक्रिया |
| १७ | लॅव्हेंडर वनस्पती लागवड |
| १८ | कृषी पर्यटन : एक शेतीपुरक व्यवसाय |
| २० | ओळखा पाहू मी कोण ? |
| २३ | विपणन वार्तापत्र - सांगली जिल्हा |




समृध्दीची एकत्र वाटचाल

संपादक : नंदकिशोर कृष्णराव कामत

Editor : Nandkishor Krishnarao Kamat

संपादकीय समन्वयन - मिलिंद आंगणे

Editorial Co-ordination - Milind Angane

(022-25523022)

Email ID : crmrcf@gmail.com



• सल्लागार समिति • | • Advisory Committee •

श्री. नरेंद्र कुमार | Mr. Narendra Kumar

श्री. संजय पडोळे | Mr. Sanjay Padole

श्री. गणेश वरगंटीवार | Mr. Ganesh Wargantiwar

सौ. निकिता पाठारे | Mrs. Nikita Pathare

श्री. सी.आर. प्रेमकुमार | Mr. C. R. Premkumar



शेती पत्रिका आता पुढील संकेत स्थळावर उपलब्ध.

www.rcfltd.com


# आधुनिक तंत्रज्ञानाने मोगरा लागवड


प्रा. रुपेशकुमार चौधरी, (वनस्पती रोगशास्त्र विभाग)

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला,

प्रा. किशोर गहाणे (उद्यानविद्या विभाग)

केवलरामजी हरडे कृषी महाविद्यालय, चामोर्शी,

जिल्हा- गडचिरोली. मो. ८२०८६६९६७०


मोगऱ्याच्या झाडाचे आयुष्य १०-१२ वर्षे असते. झाड एकदा लावले की नियमित उत्पन्न मिळते ! मोगऱ्याच्या फुलांचा उपयोग भारतात हार, तुरे, गुच्छ, गजरे, वेण्या व देवपूजेत सर्वत्र विस्तृत प्रमाणावर होत असतो.

**जमीन:** मोगरा जरी सर्व प्रकारच्या जमिनीत येत असला तरी मोगऱ्याला मध्यम खोलीची व भुरकट रंगाची, चुनखडीमुक्त जमीन योग्य ठरते. जमीन पाण्याचा चांगला निचरा होणारी असावी. निचरा न झाल्यास मोगऱ्याची पाने पावसाळ्यात पिवळी पडतात.

**पुर्वमशागत:** नांगरणीनंतर २-३ कुळवाच्या पाळ्या घालून जमीन सपाट करावी. नंतर ५ x ५ फुट अंतरावर १ x १ x १ फुट आकारचे खड्डे खोडून घ्यावेत. खड्डा भरताना प्रथम तळाशी वाळलेले गवत, काडी कचरा सहा इंच उंचीपर्यंत भरावा.




Follow : rcfkisanmanch on facebook twitter instagram

नंतर एक घमेले पुर्ण कुजलेले शेणखत आणि एक ओंजळभर गांडूळ खत तसेच **आरसीएफ भारत एनपीके १५:१५:१५** हे खत १०० ग्रॅम टाकून मातीने खड्डा भरून घ्यावा.

**हवामान:** मोगऱ्याला साधारणत: स्वच्छ हवामान मानवते. अतिशय कडक थंडीत वाढ चांगल्याप्रकारे होत नाही. मोगऱ्याची चांगली वाढ होण्यास २५ ते ३५ से.ग्रेड तापमान योग्य ठरते. अशा हवामानात कळ्या भरपूर लागून उत्पन्न वाढते.

**मोगऱ्याच्या जाती :**

**१) मोती बेला :** कळी गोलाकार असते आणि फुलात दुहेरी पाकळ्या गोलाकार असतात.

**२) बेला:** या मोगऱ्याच्या जातीला तामिळ भाषेत 'गुडूमल्ली' म्हणतात. फुलाला दुहेरी पाकळ्या असतात पण लांब नसतात.

**३) हजरा बेला:** कानडी भाषेत 'सुजीमल्लीरो' म्हणतात. फुलात एकेरी पाकळ्या असतात.

**४) मुंग्रा :** तामिळ भाषेत 'अड्डुकुमल्ली' व कन्नडमध्ये 'एलुसूत्ते मल्लरी' म्हणतात. कळ्या आकाराने मोठ्या (२.५ सेमी व्यास) असतात. फुलात अनेक गोलाकार पाकळ्या असतात.

**५) शेतकरी मोगरा :** (एक कळीचा मोगरा) ह्या मोगऱ्याला चांगल्या प्रतीच्या काळ्या येत असून हार व गजरे याकरीता वापरला जातो.

**६) बट मोगरा :** (डबल पाकळीचा) ह्या मोगऱ्याच्या कळ्या आखुड असून कळ्या चांगल्या टणक फुगतात.

बट मोगऱ्याच्या पाकळ्या घट्ट, टणक व जाड असतात. पाकळी ही कमळासारखी एकावर एक घट्ट असते. त्याला आकर्षक चमक व मंद, दिर्घकाळ दरवळणारा सुगंध असतो. काढणीस जरी उशीर झाला तरी पाकळ्या भरपूर व फुल घट्ट असल्याने टिकाऊपणा वाढतो. शेतकरी मोगऱ्यामध्ये मात्र असे नसते, ह्याला ५ पाकळ्या असून त्या लांबट जाई, कुंड्यासारख्या पातळ असून काढणीस उशीर किंवा काढणीनंतर विक्रीस उशीर झाला तर पाकळ्या कमकूवत पडून निस्तेज दिसतात. कळी नाजूक आणि मऊ असल्याने उष्णतेने जांभळी लाल ते करड्या रंगाची होते. कळ्या काढल्यानंतर लगेच उमलतात. देठ नाजूक असल्याने हारामध्ये निट ओवला जात नाही. बट मोगऱ्याचा गजरा आकर्षक असतो. मोगऱ्याचे झुडूप आकर्षक असते. त्याला पाने पोपटी व गोलाकार असतात. याउलट शेतकरी मोगऱ्याची पाने आकर्षक व चमकदार, शेंड्याला लांबट गोल, हिरवीगार दिसायला मऊ, पण हात लावल्यास कडक असतात. मोगरा काटक असल्याने यावर ऊन किंवा थंडीचा प्रादुर्भाव होत नाही. तरीपण शेतकरी मोगऱ्यापेक्षा बट मोगरा हा जास्त काटक व एकाच जागी गुच्छाच्या स्वरूपात फुले लागण असणारा आहे. कळ्या वजनदार असल्याने तोडणीस सोप्या, वाया न जाणाऱ्या असल्याने तोडणीचा खर्च कमी व भाव अधिक असतो. महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा तसेच राजस्थान, बिहार, कर्नाटक, तामिळनाडू, दिल्ली, हरियाणा अशा थंड व उष्ण विषम हवामानाच्या ठिकाणी मोगरा पिकाच्या लागवडीस फार मोठा वाव आहे.

**मोगरा लागवडीचा काळ :** मोगऱ्याची लागवड जूनचा पहिला पाऊस पडून गेल्यानंतर करावी. लागवड शक्यतो पिशवीतील रोपे लावून केली जाते.

बागाईतदारांनी नर्सरीमधील विविध जातींपैकी योग्य रोपे आणून लागवड करावी. रोपे लावताना पिशवी दोन्ही बाजूला ब्लेडने कापून (मुळांना इजा न होता) काढावी. नंतर हुंडीच्या आकाराची माती खड्ड्याच्या मधोमध काढून रोप लावावे. रोपाचे खोड वर राहील याची काळजी घ्यावी. नंतर शेजारील माती रोपाला लावून हलक्या पायांनी दाबून घ्यावे. यामुळे जमिनीत पोकळी राहत नसून झाड न कोलमडता सरळ वाढते. रोपे लावल्यानंतर 'जर्मिनेटर' १ लिटर

व पाणी १०० लिटर यांचे द्रावण तयार करून प्रत्येक रोपाच्या शेंड्यावरून बुंध्यावर १०० मि.लि. ओतावे. म्हणजे फुट वाढते आणि मर होत नाही.

रोपांची झपाट्याने वाढ होण्यासाठी प्रत्येक झाडास सुरवातीस १० ते १५ ग्रॅम **आरसीएफ भारत एनपीके १५:१५:१५** खत द्यावे. रोगमुक्त फुट वाढणे व फुले चांगल्या प्रकारे लागण्यासाठी प्रत्येक झाडास या खताचा २५ ग्रॅम वापर दर महिन्यास करावा.


**पाणी व्यवस्थापन :** मोगऱ्याला पाणी भरपूर लागत नसले तरी जमिनीनुसार उन्हाळ्यात चौथ्या दिवशी व हिवाळ्यात सात ते आठ दिवसांनी पाणी देताना बांगडी पद्धत वापरावी. पाणी अधिक दिल्यास निचरा न झाल्याने पाने पिवळी पडून विकृती येते आणि मर होण्याची शक्यतो असते.

**काढणी:** मोगऱ्याला लागवडीच्या पहिल्या वर्षीच काही प्रमाणात फुले येतात. त्यानंतर पुढील वर्षी फुलांचे उत्पादन वाढते. तिसऱ्या वर्षापासून फुलांचे भरपूर उत्पादन मिळते. सर्वसाधारणपणे फेब्रुवारी ते ऑगस्टपर्यंत फुलांचा हंगाम असतो. संक्रांतीपासून कळ्यांना चांगलाच बहर असतो. नियमित कळ्या खुडल्यामुळे मागील येणाऱ्या कळ्या लवकर मोठ्या होतात. कळी खुडताना प्लॅस्टिकच्या पिशवीत जमा करावी. कारण कळ्या अंगाच्या उष्णतेमुळे उमलतात व पिवळ्या पडतात. मोगरा सकाळी सुर्योदयापूर्वी खुडावा. मुलांना अशाप्रकारचे शिक्षण देऊन आपण त्यांना ५० ते १०० रुपये मिळवून देऊ शकतो, म्हणजे 'कमवा आणि शिका' ही कर्मवीर भाऊराव पाटील यांची शिकवण सार्थ ठरेल! मात्र सर्व कळ्या प्लॅस्टिकच्या पिशवीतच खुडून घ्याव्यात.

बहार धरतांना प्रथम कमी पाणी द्यावे व ३-४ दिवसांनी भरपूर पाणी दिल्यास फुट येऊन कळ्यांचा बहर येऊन चांगले उत्पन्न मिळते.

भावी काळात मोगऱ्याची लागवड फार मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता आहे. मोगऱ्याच्या फुलापासून अत्तर काढले तर इतर सर्व बाबींचा खर्च कमी करता येईल.

आपण मोगऱ्यामध्ये आंतरपीक म्हणून पहिल्या वर्षी बटाटा (खरीप) बीट, गाजर, कोथिंबीर, शेपू व आंबट चुका ही पिके घेऊन बऱ्यापैकी उत्पन्न मिळवून हे पैसे आंतरमशागतीच्या कामासाठी वापरू शकतो.



**स्वातंत्र्य म्हणजे आभाळातून कोसळलेला पाऊस नव्हे, तमाम क्रांतिकारकांनी घाम आणि रक्ताने शिंपून कष्टाने फुलविलेले हे पुष्प आहे. देशाच्या स्वातंत्र्य आणि उन्नत्तीसाठी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांची देशभक्ती आणि देशासाठी केलेला त्याग आजही देशवासियांना प्रेरणा देत आहे. राज्यात २८ मे हा स्वातंत्र्यवीर सावरकरांचा जन्मदिवस "स्वातंत्र्यवीर गौरव दिन" म्हणून साजरा करण्यात येणार आहे. या महान व्यक्तिमत्वाच्या त्यागाची ज्योत तेवत ठेवणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे. त्यांच्या अतुलनीय योगदानाला, धैर्यशील विचारांना आणि देशभक्तीला आरसीएफ परिवारातर्फे कोटी कोटी प्रणाम.**

- **थोडं सहकार्य, थोडं नियोजन,**
  **जल फुलवी आपले जीवन**
- **जलसंवर्धनाला नाही पर्याय,**
  **पाणी अडवा हाच उपाय**

# पुदिना उत्पादन तंत्रज्ञान

डॉ.अरुण नाफडे, उद्यानविद्या विशेषज्ञ, डी-६ ब्रह्मा मेमोरिज, भोसले नगर पुणे-७.
मो.९८२२२६११३२



पुदिना ही 'लॅमिएसी' (Lamiaceae) कुळातील वनस्पती असून तिचे शास्त्रीय नाव 'मेंथा अर्व्हेन्सिस' (Mentha arvensis) आहे. जगात सर्वत्र या प्रजातीच्या १३ ते १८ जाती असून भारतात ६ जाती आढळतात. पुदिना ही मूळची यूरोप, पश्चिम व मध्य आशिया येथील असून ती आता आफ्रिका, ऑस्ट्रेलिया तसेच अमेरिका यांच्या लगतच्या समशीतोष्ण प्रदेशांत आढळते. ही सुगंधित वनस्पती आहे. पानांचा रंग गडद हिरवा असून त्यांच्या कडा दंतुर असतात. फुले जांभळी व पानांच्या बगलेत फुलोऱ्यामध्ये येतात.

पुदिन्याच्या पानांमध्ये औषधी गुणधर्म आहेत. ती उत्तेजक, वायुनाशी व पोटदुखी, अर्धशिशी, सांधेदुखी, बद्धकोष्ठ, अतिसार, पोटांतील व्रण व सर्दी अशा विकारांवर गुणकारी आहे. पाने स्वयंपाकात स्वादाकरिता वापरतात. पानांतून बाष्पनशील मिंट तेल काढून ते सौंदर्यप्रसाधनांमध्ये वापरतात. पानांपासून मिळवलेल्या तेलात ७०% 'मेंथॉल' असते. चहा, सरबते, जेली, कँडी, सूप आणि आइसक्रीम यांत पानांचा सुगंध मिसळतात. गांधीलमाश्या, मुंग्या व झुरळे यांचा उपद्रव टाळण्यासाठी पुदिन्याचे तेल सेंद्रिय कीटकनाशकांमध्ये मिसळले जाते.

व्यापारीदृष्ट्या लागवड केल्या जाणाऱ्या अनेक प्रजाती आहेत, सर्वात जास्त लागवड करण्यात येणाऱ्या चार प्रजाती आहेत

(१) जपानी पुदिना (Mentha carvensis), (२) पेपरमिंट (Mentha piperita) (३) स्पिअरमिंट (Mentha specata) (४) लेमन मिंट (Mentha citrata)

या वनस्पतीचे संपूर्ण खोड आणि पर्णसंभार हा औषध आणि स्वाद उद्योगात वापरल्या जाणाऱ्या मेन्थॉल, कार्व्होन, लिनोलॉल आणि लिनोनेल ॲसीटेटचा समृद्ध स्रोत आहे.

मागील चार दशकांपासून, पुदीनाची लागवड भारतात केली जाते. यापैकी उत्तर भारतात मेन्थॉल साठी जपानी पुदिना पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. इतर प्रमुख उत्पादक देश म्हणजे चीन आणि ब्राझील आणि थोड्या प्रमाणात थायलंड आणि व्हिएतनाममध्ये याची लागवड केली जाते.

लागवडीच्या टप्प्यावर हलक्या सरी आणि कापणीच्या वेळी भरपूर सूर्यप्रकाश लागवडीसाठी योग्य असतो. ६ ते ८.१ दरम्यान सामू असलेली मध्यम ते सुपीक खोल, मध्यम काळी, सेंद्रिय सामग्रीयुक्त आणि पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन पुदिनाच्या लागवडीसाठी योग्य आहे.

देशात विकसित करण्यात आलेल्या नवीन जाती

**१) एमएएस -१ (MS-1) -**

● कमी उंचीची (३० ते ४५ सें.मी.) आणि लवकर परिपक्व होणारी. ● मेंथॉलचे प्रमाण - ७० ते ८०% ● उत्पादन सुमारे २०० क्विंटल प्रति हेक्टर

**२) संकरित -७७ (Hybrid-77) -**

● लवकर परिपक्व होणारी ● उंची ५० ते ६० सें.मी. ● ८० ते ८५ % मेन्थॉल असते ● उत्पादन २५० क्विंटल प्रति हेक्टर ● ही जात वालुकामय चिकणमाती मध्ये उत्तम प्रकारे वाढते, मात्र कोरडे हवामान आवश्यक आहे.

**३) शिवालिक (Shivalik) - (चिनी संस्कारातून निवड)**

● मेन्थॉल ६५ ते ७०% ● या जातीची लागवड विशेषतः उत्तर प्रदेश च्या तराई भागात केली जाते

**४) इसी– ४१९११ (EC-41911) - (रशियन जर्मप्लाझम मधून निवड)**

● ही एक सरळ ताठ प्रकारात वाढणारी जात आहे, ज्यावर अति पावसाचा कमी परिणाम होतो ● औषधी वनस्पतीचे २३६ क्विंटल उत्पादन ● ७०% मेन्थॉलसह १२५ किलो प्रति हेक्टर तेल उत्पादन ● खाद्यपदार्थांना चव येण्यासाठी तेलाला प्राधान्य दिले जाते.

**५) गोमती (GOMTI) -**

● ही जात जोमदार वाढणारी आणि हलक्या लाल रंगाची आहे. ● मेन्थॉल – ७८ ते ८०%. ● रोगांला प्रतिरोधक आहे. ● पानांचा आकार इतर जातींपेक्षा मोठा असतो.

**६) हिमालय (Himalaya) -**

● तांबेरा व पानांवरील डाग इत्यादी रोगांना प्रतिरोधक आहे. ● पानांचा आकार इतर जातींपेक्षा मोठा असतो ● मेन्थॉल ७८ ते ८०% ● औषधी वनस्पतींचे उत्पादन ४०० क्विंटल आणि तेलाचे २०० किलो प्रति हेक्टरी आहे.

**७) कोसी (Kosi) -**

● ९० दिवसांत परिपक्व होते. ● तांबेरा आणि 'लीफ स्पॉट' रोगाला प्रतिरोधक आहे. ● ७५ ते ८०% मेन्थॉल. ● उत्पन्न २०० ते २५० किलो तेल प्रति हेक्टर

**८) सक्षम (Saksham) -**

● तांबेरा आणि व बुरशीजन्य रोगांना प्रतिरोधक आहे. ● उत्पन्न २०० ते २५० किलो. तेल प्रति हेक्टर ● ८०% पेक्षा जास्त मेन्थॉल ● टिश्यू कल्चरद्वारे विकसित.

स्टोलोन्स (Stolons) आणि शाखांद्वारे याचा प्रसार केला जातो. चांगल्या वाढीसाठी मागील लागवडीपासून स्टोलोन्स मिळतात (डिसेंबर आणि जानेवारी महिन्यात). पिकाचे संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी कॅप्टन ०.२५% किंवा बेनेलेट ०.१% ची बीजप्रक्रिया करावी. विश्वसनीय नर्सरीमधून आणलेल्या वाणांची ३० X ३० से.मी. अंतरावर लागवड करावी.

## जमीन तयार करणे

पुदिना लागवडीसाठी ६० सेंटीमीटर रुंद आणि ३० सेंटीमीटर उंचीच्या आकाराचे गादीवाफे बनविले जातात. जमीन तयार करताना नांगरणी व कुळवणी करावी. ६ ते ८ मे. टन सेंद्रिय खत प्रति हेक्टर वापरावे. दोन गादीवाफ्या दरम्यान ४० सेंटीमीटर अंतर ठेवावे. स्टोलोन्सची दोन ओळींमध्ये लागवड करावी. लागवडीनंतर ताबडतोब पाणी द्यावे.

## पाणी व्यवस्थापन

सिंचनासाठी ठिबक सिंचन प्रणाली अंगीकृत करावी, ज्यामुळे पिकाच्या वाढीच्या टप्प्यात पाण्याबरोबर या प्रणालीद्वारे खतांची मात्रा अचूक प्रमाणात दिली जाऊ शकते.

## खत व्यवस्थापन

रासायनिक खतांसाठी शिफारस केलेली मात्रा म्हणजे नायट्रोजन १२० किलो, फॉस्फरस ६० किलो आणि पोटॅशियम ४० किलो प्रति हेक्टर. फॉस्फरस आणि पोटॅशियमची संपूर्ण मात्रा व नायट्रोजन २४ किलो पेरणीच्या वेळी मातीमध्ये मिसळतात, उर्वरित भाग दोन वेळा 'टॉप ड्रेसिंग' म्हणून दिला जातो. पाण्यामध्ये विद्राव्य खते ठिबक प्रणालीद्वारे दिली जातात तेव्हा वनस्पती वाढीच्या अवस्थेनुसार खताची मात्रा विभाजित करून द्यावी.

## आंतर मशागत

तण नियंत्रणासाठी लागवडीनंतरचा ४ ते १४ आठवड्यांचा काळ निर्णायक असतो. यासाठी

'ऑक्सीफ्लूरोफेन' (०.५ किलो प्रति हेक्टर), 'पेंडीमेथालीन' (०.७५ किलो प्रति हेक्टर), 'सिमाझिन' किंवा 'ॲट्राझिन' (१ किलो प्रति हेक्टर) या तणनाशकांचा वापर करावा.

## कीटक आणि त्यांचे नियंत्रण –

**१. केसाळ अळी (Hairy Caterpillar) :–** सुरवंट पानांच्या पृष्ठभागाखाली असतात ते हिरव्या पानांवर पोसतात आणि संपूर्ण झाडाचे नुकसान करतात.

**नियंत्रण –** या कीटकाच्या नियंत्रणासाठी मेलॅथिऑन २ मि.लि. प्रति लिटर पाण्यात मिसळून दोन ते तीन फवारण्या कराव्यात.

**२. पाने आणि खोड कुरतडणारी अळी (Cutworms) :** ही कीड लहान रोपांचे नुकसान करते.

**नियंत्रण –** या कीटकाच्या नियंत्रणासाठी लागवडीपूर्वी प्रति एकर जमिनीत ८ किलो दाणेदार फोरेट मिसळावे.

**३. पाने गुंडाळणारी अळी (Mint Leaf Roller):** सुरवंट ऑगस्ट ते सप्टेंबर दरम्यान पानांच्या गुंडाळीच्या मध्ये शिरून पाने खातात.

**नियंत्रण –** साप्ताहिक अंतराने मेलॅथिऑन २ मि.ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून तीन फवारण्या कराव्यात.

## रोग आणि त्यांचे नियंत्रण–

**१. स्टोलोन रॉट (Stolon Rot):** पावसाळ्यात, हा रोग भूमिगत भागांवर उद्भवतो, परिणामी रोप कूजते.

**नियंत्रण –** पीक फेरपालट करणे किंवा स्टोलोन्स लागवड करण्यापूर्वी ०.२५% कॅप्टन किंवा बेनलेट ०.०१% किंवा ०.३% अगॅलॉल द्रावणात २ ते ३ मिनिटे बुडवून लागवड करणे हा एक प्रतिबंधात्मक उपाय आहे. यामुळे स्टोलोन रॉट या रोगाचे नियंत्रण करता येईल.

**२. फ्यूजेरियम विल्ट (Fusarium Wilt) :** प्रभावित पाने पिवळी, आक्रसलेली होतात.

**नियंत्रण –** 'बाविस्टिन' या बुरशीनाशकाच्या ७ दिवसांच्या अंतराने ३ फवारण्या कराव्यात.

**३. करपा (Leaf blight) :** या रोगाच्या नियंत्रणासाठी ताम्रयुक्त बुरशीनाशकांची फवारणी करावी.

## काढणी व पीक उत्पन्न

जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात स्टोलोन्सद्वारे लागवड केलेल्या पिकाची कापणी दोनदा म्हणजे जून आणि ऑक्टोबर महिन्यात करतात. कापणीच्या टप्प्यात असलेल्या ताज्या औषधी वनस्पतीमध्ये ०.५ ते ०.६८% तेल असते. दोन कापणीमध्ये, साधारणतः एका वर्षात २५० किलो तेलाचे उत्पादन मिळते.

स्टीम डिस्टिलेशनद्वारे तेल काढतात, हे तेल सोनेरी पिवळ्या रंगाचे असते. ज्यामध्ये ७५% पेक्षा अधिक 'मेन्थॉल' असते.

## पुदिन्याचे फायदे–

१. पुदिन्यामध्ये असलेले फायबर कोलेस्ट्रॉल (चरबी) चे प्रमाण कमी करण्यास तसेच उपलब्ध मॅग्नेशियममुळे हाडे मजबूत होतात.

२. उलटी होत असेल तर दोन चमचे पुदिना रस दर दोन तासाने त्या व्यक्तीला द्यावा.

३. जर आपल्याला पोटा संबंधी आजार असतील तर पुदिन्याच्या ताज्या पानामध्ये लिंबाचा रस व त्याच्या समान मात्रेत मध मिळून सेवन केल्याने पोटाच्या सर्वच आजारांवर लवकर आराम मिळतो.

४. सर्दी झाल्यावर थोडा पुदिन्याचा रस आणि त्यात काळी मिरी आणि थोडे सैंधव मीठ मिसळून ज्या प्रकारे आपण चहा बनवतो त्याच प्रकारे चहा सारखा उकळवून घ्यावा. हा काढा सर्दी, खोकला, तसेच तापावर गुणकारी आहे.

५. खूप वेळ उचकी येत असेल तर पुदिन्याची काही पाने सेवन केल्यास उचकी बंद होईल.

६. जखम झाली असेल किंवा खरचटले असेल तर त्याच्यावर पुदिन्याची ताजी पाने वाटून घेऊन लावा यामुळे जखम लवकर भरेल.

७. गजकर्ण, खाज तसेच अन्य प्रकारचे त्वचेचे रोग असतील तर ताजी पुदिन्याची पाने घेऊन ती चांगली वाटून घ्या आणि हा लेप ज्या ठिकाणी खाज किंवा गजकर्ण झाले असेल तिथे लावल्यास लगेच आराम मिळेल.

८. तोंडाला वास येत असेल तर पुदिन्याची पाने सुकवून त्याचे चूर्ण बनवा. याचा दंतमंजनसारखा वापर केल्यास हिरड्या मजबूत होतील.

९. पुदिना रस मिठाच्या पाण्यात मिसळून गुळण्या केल्याने आवाज बसला असेल तर तो ठीक होईल.

१०. उन्हाळ्यामध्ये गरमीच्या दिवसात अस्वस्थ तसेच घाबरल्या सारखे होते. त्यासाठी काही पुदिन्याची पाने तसेच अर्धा चमचा वेलचीचे चूर्ण एक ग्लास पाण्यात घेऊन ते उकळवा आणि ते पाणी गार झाल्यावर प्यावे.

११. कॉलरा झाला असेल तर कांद्याचा व लिंबाचा रस पुदिन्याच्या रसासोबत मिसळून प्यायल्याने आराम मिळतो.

१२. आपली त्वचा तेलकट असेल तर पुदिन्यापासून बनवलेला फेशियल आपल्यासाठी चांगला ठरेल, दोन मोठे चमचे पुदिन्याचे वाटण आणि दोन चमचे दही तसेच एक मोठा चमचा ओट मील (ओटचे जाडे भरडे पीठ) मिसळून याचा जाड लेप बनवा आणि हा लेप १५ मिनिटांसाठी चेहऱ्यावर लावा आणि नंतर थंड पाण्याने चेहरा धुवा आठवड्यातून कमीत कमी असे दोन वेळा करा. त्वचेचा तेलकटपणा कमी होईल. पुदिन्याचा रस मुलतानी माती सोबत मिसळून त्याचा चेहऱ्यावर फेशियल सारखा वापर केल्याने सुद्धा त्वचेचा तेलकटपणा कमी होऊन चेहऱ्याची चमक वाढेल.

## आमची शेती पत्रिका आमचा अभिप्राय

* शेती क्षेत्राला उत्तेजन मिळण्याच्या दृष्टीने आरसीएफ शेती पत्रिका अत्यंत उपयुक्त आहे.

– परमेश्वर भागवत पासले
मु.पोस्ट– यावली, तालुका– बार्शी,
जिल्हा–सोलापुर ४१३४१२. मो. ९४२३०६४६९८

* या मासिकाचा शेतीचे योग्य प्रकारे नियोजन आणि उत्पादन मिळविण्यासाठी खूप उपयोग होतो.

– श्रीरंग मधुकर घाटोळ
बंकट सदन जवळ, तेलीपूरा, पोस्ट– तालुका शेगांव,
जिल्हा–बुलढाणा ४४४२०३. मो.९४२१४६९८७१

* आरसीएफ शेतीपत्रिका शेतकऱ्यांसाठी उपयुक्त आणि मार्गदर्शक मासिक ! खूप छान माहिती आणि व्यवस्थित मांडणी !

– सुदर्शन चंद्रकांत लोहार
मु.पोस्ट–तरडगाव, तालुका–फलटण,
जिल्हा–सातारा ४१५५२८. मो.९१३०८६९९०१

* मी छोटा बागायतदार शेतकरी असून आपले मासिक आम्हाला खूप आवडले, कृपया मला सभासद करून घ्यावे.

– उमेश जयप्रकाश काळे
मु.पोस्ट–काळे वस्ती, तालुका–कोपरगाव,
जिल्हा– अहमदनगर ४२३६०३. मो.९७३०७६८५८७

* 'आरसीएफ शेती पत्रिका' एक सुंदर आणि वैशिष्ट्यपूर्ण कृषी मासिक आहे ! आरसीएफ कंपनी शेतकऱ्यांना विनाशुल्क देत असलेल्या या सुविधेबद्दल खूप खूप धन्यवाद !

– ओमप्रकाश मोहनलाल उपाध्याय
श्रीइच्छापुर्ती अंबामाता मंदीर जवळ, शिरसोली रोड,
जळगाव ४२५००२. मो.९३७२२२४८२२

* 'आरसीएफ शेती पत्रिका' मासिक शेती अभ्यासावर आधारित असून त्याचा लाभ शेतकरी वाचकांना आमच्या वाचनालयाच्या माध्यमातून होत आहे त्याबद्दल आम्ही आभारी आहोत.

– ग्रंथपाल,
राजर्षी शाहू नगर वाचन मंदीर, शिरोळ,
जिल्हा–कोल्हापुर ४१६१०३

# बासील – एक उपयुक्त सुगंधी वनस्पती

डॉ. अरूण नाफडे, उद्यान विशेषज्ञ, डी–६, ब्रम्हा मेमोरिज, भोसले नगर, पुणे – ४११००७.
मो. ९८२२२६११३२



बासीलचा सर्वात सामान्य प्रकार म्हणजे गोड बासील; इतर प्रकारांमध्ये जांभळा बासील, लिंबू बासील (लिंबाचा चव) आणि थाई बासील (ज्येष्ठमध चव) यांचा समावेश आहे.

**गोड बासील (Sweet Basil)** – गोड बासील हा सर्व मान्य वाण आहे. सॅलड्स आणि पास्ता याच्यामध्ये याचा वापर करतात. याची पाने गोल आकाराची असून मध्यम हिरव्या रंगाची असतात.

**जांभळा बासील (Purple Basil)** – जांभळा बासील इतर वाणांइतका गोड नसतो, त्याला थोडीशी लवंगाची चव असते.

**थाई गोड बासील (Thai Sweet Basil) –** गडद, सदाहरित झुडूप आणि पाने लहान असतात. शिजवल्यानंतरही त्याची चव टिकून राहते.

**लिंबू बासील –** भाज्यांमध्ये किंवा चहा म्हणून देखील याचा वापर केला जातो.

बासीलची लागवड २० मीटर लांबी आणि रूंदी – ६० सें.मी.च्या गादीवाफ्यावर करतात. रोप आणि ओळीतील अंतर ३० x ४५ सें.मी. ठेवावे. पिकाचा कालावधी ११० ते १४० दिवस असतो. जमिनीची निवड करतांना सेंद्रिय पदार्थयुक्त आणि ६.५ ते ७.५ दरम्यान सामू असावा. गादीवाफ्यावरील माती सिल्व्हर पॅरॉक्साईडने निर्जंतुक करावी. मल्चिंगचा वापर केल्यास तणनियंत्रण चांगल्या प्रकारे होते. ४० ते ६० दिवसांच्या अंतराने पाण्याची नियमित कापणी करावी.

सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या पुरवठ्यासाठी आरसीएफ माइक्रोलाची लागवडीनंतर दर २० दिवसांनी २.५ मि.लि प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच लावणीनंतर ३५ दिवसांनी आणि पानांच्या प्रत्येक कापणी नंतर विद्राव्य खत सुजला १९:१९:१९ – ५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पीक संरक्षण व्यवस्थापन करतांना मावा, तुडतुडे, पाने कुरतडणारी अळी तसेच अँथ्रोक्नोज, करपा इत्यादी रोगांचे नियंत्रण करावे. या पिकापासून ६ ते ८ मे.टन ताज्या पानांचे उत्पादन मिळते.

| बासील पीकासाठी खत व्यवस्थापन (प्रति एकर) | आरसीएफ भारत युरिया ४६:०:० | आरसीएफ भारत एनपीके १५:१५:१५ | सिंगल सुपर फॉस्फेट ०:१६:० | मॅग्नेशियम सल्फेट | कॅल्शियम नायट्रेट |
|---|---|---|---|---|---|
| मातीमध्ये रोप लावणी पूर्वी मिसळणे | २२.०० किलो | ६६.५ किलो | ६२.५ किलो | १०.०० किलो | २.०० किलो |
| लावणीनंतर ३० दिवसानंतर | २२.०० किलो | – – | – – | ५.०० किलो | – – |
| लावणीनंतर ६० ते ७० दिवसानंतर | २२.०० किलो | – – | – – | १०.०० किलो | २.०० किलो |

(शेवटच्या कुळवणीच्या वेळी जमीन तयार करताना शेणखत ५ ते ६ मेट्रिक टन आणि २०० किलो निंबोळी पावडर मातीमध्ये मिसळावी.)

# आरसीएफ विद्राव्य खत - सुजला १९:१९:१९

संजय पडोळे, मुख्य प्रबंधक (सीआरएम- विपणन),
मिलिंद आंगणे, प्रबंधक (सीआरएम- विपणन) आरसीएफ लि. मुंबई ४०००२२




खत व्यवस्थापनामध्ये जमिनीतून देण्यात येणाऱ्या खतांपेक्षा विद्राव्य खतांची कार्यक्षमता खूपच जास्त असते हे आता सर्वांना माहित आहेच! आरसीएफ खत उद्योगातर्फे दर्जेदार व निर्यातक्षम पीक उत्पादनासाठी पाण्यात १००% विरघळणाऱ्या सुजला १९:१९:१९ या विद्राव्य खताची निर्मिती करण्यात आलेली आहे. यामध्ये पीक वाढीसाठी आवश्यक प्रमुख अन्नद्रव्य नत्र- १९%, स्फुरद- १९% आणि पालाश-१९% उपलब्ध आहेत. या व्यतिरिक्त गंधक, मग्न ह्या अन्नद्रव्यांचा त्यात समावेश आहे.




आरसीएफ तर्फे ही विद्राव्य खत शृंखला भाजीपाला, फुलशेती, फळबाग, द्राक्ष, डाळिंब, केळी, कापूस यासारखी नगदी पिके तसेच हरितगृहात आधुनिक तंत्राने लागवड करण्यात येणाऱ्या पिकांसाठी विकसित करण्यात आलेली आहे. हे खत आरसीएफच्या मुंबई येथील संकुलात तयार करण्यात येते. यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचा दर्जा उत्तम असतो.

* सुजला खत फवारणीतंत्राने किंवा ठिबक सिंचनाद्वारे देता येते. हे खत थेट पानांच्या किंवा मुळांच्या कक्षेत जात असल्याने पीक पोषणासाठी त्वरित उपलब्ध होते.

* या खतातील अन्नद्रव्यांची कार्यक्षमता ९०% हून अधिक असते.

* सुजला खत सर्व प्रकारची शेतपिके, फळबाग, रोपवाटिका, परसबाग, हरितगृहामधील फुलपीक, भाजीपाला लागवड इत्यादीसाठी उपयुक्त आहे.

* हे खत पिकाची गरज व अवस्थेनुरूप देता येते तसेच खत व्यवस्थापनामध्ये समतोलपणा साधता येतो.

* खत योग्य मात्रेत दिल्याने त्यातील अन्नद्रव्ये निचऱ्यावाटे किंवा स्थिरीकरणामुळे वाया जात नाहीत.

* खताच्या आम्लधर्मीयपणामुळे जमिनीचा सामू (PH) नियंत्रित होण्यास मदत मिळते.

* या खताच्या वापराने ठिबक संचात क्षार साचत नसल्याने ड्रीपर्स किंवा स्प्रे पंप नोझल बंद होत नाहीत.

* सुजला खतामुळे पीक उत्पादनात ३०% वाढ दिसून येते तसेच दर्जेदार शेतीमाल मिळाल्याने बाजारभावही अधिक मिळतो.

* अन्नधान्य पिकांसाठी (उदा. भात, गहू, ज्वारी इत्यादी) नवीन फुटवे येताना, फुले येण्याच्या अगोदर एक आठवडा व दाणे भरण्याच्या अवस्थेत अशा तीन फवारण्या कराव्यात.

* तेलबिया पिकांसाठी (उदा. सूर्यफुल, भुईमूग, सोयाबीन, करडई इत्यादी) पेरणी नंतर ३० दिवसांनी, फुलधारणेच्या अगोदर एक आठवडा व

(पुढील भाग पान नं. २२ वर)

## श्रीतुळजाभवानी कृषी महोत्सव आणि जिल्हास्तरीय कृषी प्रदर्शन–जिल्हा धाराशिव (उस्मानाबाद)



धाराशिव (उस्मानाबाद) येथे आरसीएफ जिल्हा कार्यालय, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, व प्रकल्प संचालक, (आत्मा) धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित श्रीतुळजाभवानी कृषी महोत्सव या जिल्हास्तरीय कृषी प्रदर्शनमध्ये आरसीएफने सहभाग नोंदवला. याप्रसंगी कृषी विभागाचे गुणनियंत्रण अधिकारी श्री. चेतन जाधव, आत्मा संचालक श्री.शिंदे, कृषी विभागाचे काशीद तसेच खत विक्रेते व शेतकऱ्यांनी आरसीएफ स्टॉल ला भेट दिली, मान्यवरांचे स्वागत श्री. गणेश खाडे, जिल्हा प्रभारी धाराशिव यांनी केले आणि उपस्थित शेतकऱ्यांना खत उत्पादन वापर आणि पीक लागवड विषयी माहिती दिली.

## पालघर जिल्ह्यातील ऑनलाइन 'बीज प्रक्रिया' स्पर्धेमधील विजेत्यांचा सन्मान सोहळा



पुरुष गट–१) श्री. आशिष रमेश भोये, धुंदलवाडी, तालुका डहाणू, २) श्री. नरेश दत्तात्रेय चौरे, गाव वेऊर, तालुका पालघर, महिला गट – १) श्रीमती मनीषा प्रशांत पाटील, माकुणसार, तालुका– पालघर, २) श्रीमती प्रज्ञा लक्ष्मीप्रसाद पाटील, आडणे, तालुका – वसई, श्री. दिलीप शांताराम नेरकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, श्री. जे.बी. सूर्यवंशी गुणनियंत्रण अधिकारी पालघर, श्री. वैती, तालुका कृषी अधिकारी पालघर, श्री. एस. डी. गोवेकर आरसीएफ जिल्हा प्रभारी पालघर, श्री. अनिल मोरे, कृषी सहाय्यक, श्री. कल्पेश कोटी, कृषी सहाय्यक पालघर आदी मान्यवर आणि शेतकरी बहुसंख्येने कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

## शेतकरी सभा– जिल्हा रायगड



मौजे आवास, तालुका– अलिबाग, जिल्हा– रायगड येथे शेतकरी सभा घेण्यात आली. कार्यक्रमासाठी श्री. हेमंत गुरसाळे (मुख्य व्यवस्थापक, शेतकरी प्रशिक्षण केंद्र, थळ), श्री. निखिल नांदगावकर (कृषी सुविधा केंद्र प्रतिनिधी), श्री. नंदकुमार कवळे (शेतकरी प्रमुख) तसेच ग्रामपंचायत पदाधिकारी उपस्थित होते. आरसीएफच्या वतीने संतुलित खत वापर आणि शेतीतून उत्पन्नवाढ याविषयी शेतकऱ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच आरसीएफची उत्पादने सुजला, मायक्रोला, बायोला याबाबत तसेच माती परीक्षण त्याचे फायदे व माती नमुना कसा काढावा याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

## शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम– जिल्हा वाशिम



आरसीएफ जिल्हा कार्यालय वाशिम यांच्या वतीने वाशिम जिल्ह्यातील निवडक २७ प्रगतिशील शेतकऱ्यांसाठी आरसीएफ शेतकरी प्रशिक्षण केंद्र, नागपुर येथे तीन दिवसीय कृषी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कृषी विद्यापीठातील कृषीतज्ज्ञांतर्फे सोयाबीन, गहू, कापुस, शेंगदाणा पीक लागवड, पशुवैद्यकीय उपचार, जैविक खत वापराचे महत्व इत्यादी विषयांवर सविस्तर माहिती देण्यात आली. शेतकऱ्यांसाठी ही प्रशिक्षण योजना आरसीएफ तर्फे मोफत देण्यात आली होती. आरसीएफच्या वतीने वरिष्ठ प्रबंधक श्री. नितिन पानझडे आणि श्री. ए.पी. नारळे यांनी कार्यक्रमाचे यशस्वीपणे नियोजन केले होते.

# सामाजिक बांधीलकीची...

आज़ादी का अमृत महोत्सव

## शेतकरी मेळावा– जिल्हा नाशिक




आरसीएफ जिल्हा कार्यालय– नाशिक तर्फे महाल पाटणे, ता. देवळा येथे १३० शेतकऱ्यांच्या उपस्थितीत शेतकरी मेळावा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी श्री. बजरंग कापसे, (आरसीएफ जिल्हा प्रभारी नाशिक) यांनी नवीन उपलब्ध होणारी खते उदा. नॅनो युरिया, विपुला १०:१०:१०, शुभदा (सूक्ष्म अन्नघटक मिश्रणयुक्त खत), PDM (पोटॅश) आणि कृषी उत्पादन वाढीच्या दृष्टीने त्यांचा कार्यक्षम वापर ह्याबद्दल माहिती दिली. तसेच श्री. हेमंत गुरसाळे, (प्रमुख शेतकरी प्रशिक्षण केंद्र, अलिबाग) ह्यांचे कांदा पीक व अन्नद्रव्य व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन लाभले.

## पशुवैद्यकीय शिबीर–जिल्हा भंडारा




आरसीएफ जिल्हा कार्यालय भंडारा आणि पशुवैद्यकीय चिकित्सालय, कर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे कर्डी, तालुका– मोहाडी येथे पशुवैद्यकीय शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य श्री. महादेव पाचघरे यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. गुणवंत भडके, डॉ. विठ्ठल हटवार, डॉ. दिपक मडीकुंतीवार यांच्या हस्ते शेतकऱ्यांच्या पाळीव जनावरांवर मोफत उपचार करण्यात येऊन औषधांचे वाटप करण्यात आले. आरसीएफ जिल्हा प्रभारी श्री. अमोल लहाने यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करून शेतकऱ्यांना लाभान्वित केले.

## जिल्हास्तरीय कृषी महोत्सव– जिल्हा लातुर



जिल्हास्तरीय कृषी महोत्सव, लातुर येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी कृषीप्रदर्शनामध्ये आरसीएफ जिल्हा कार्यालय लातुर तर्फे सहभाग नोंदविण्यात आला. श्री. बी. पृथ्वीराज (जिल्हाधिकारी लातुर), श्री. अभिनव गोयल (मुख्यकार्यकारी अधिकारी लातुर), श्री. दत्तात्रय गावसाने (कृषी अधीक्षक), कृषी विभागाचे कर्मचारी शेतकरी बांधव यांनी स्टॉलला भेट दिली आणि आरसीएफ च्या सर्व उत्पादनांबद्दल माहिती जाणून घेतली. प्रदर्शनामध्ये शेतकऱ्यांना जिओला, विपुला, PH बॅलन्सर, सिटी कंपोस्ट, सुजला, बायोला, माइक्रोला व सुफला बद्दल माहिती तसेच माहितीपत्रके देण्यात आली. या प्रदर्शनामध्ये प्रगतिशील शेतकरी, कृषी व्यावसायिक, मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## माती परीक्षण दिन – जिल्हा रत्नागिरी




गाव–कसोप, तालुका आणि जिल्हा रत्नागिरी, येथे आरसीएफ कार्यालय रत्नागिरी व कृषी विभाग द्वारे माती परीक्षण दिनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. हेमंत गुरसाळे (मुख्य व्यवस्थापक, शेतकरी प्रशिक्षण केंद्र, अलिबाग– थळ), श्री.प्रवीण चाहाकार (आरसीएफ जिल्हा प्रभारी रत्नागिरी), श्री. माधव बापट (मंडळ कृषी अधिकारी), श्री. लक्ष्मीकांत मांडवकर ( कृषी पर्यवेक्षक) तसेच श्रीमती विचारे (अध्यक्ष बचत गट) आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात एकात्मिक कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन, कृषी विभागाच्या योजना आणि आरसीएफच्या विविध खत उत्पादनांबाबत माहिती देण्यात आली. तसेच कार्यक्रमामध्ये बीजप्रक्रिया ऑनलाईन स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान करण्यात आला.

# आवश्यक सुगंधी तेल आणि त्यांचे फायदे

डॉ. अंकित सुनील खेडीकर, सहाय्यक प्राध्यापक (उद्यानविद्या) श्री. सेवकभाऊ वाघाये-पाटील
कृषी महाविद्यालय, केसलवाडा/वाघ जिल्हा-भंडारा. मो. ७०६६६४४६८८

सुगंधी तेलांचा उपयोग जगात सुगंधी द्रव्ये तसेच औषधामध्ये अगदी प्राचीन काळापासून केला जात आहे. त्याचे अनेक लाभ आहेत, आताच्या काळात सुद्धा त्याचे महत्व कमी झालेले नाही! या पैकी काही महत्वाच्या तेलांची थोडक्यात माहिती या लेखातून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## पेपरमिंट तेल-



पेपरमिंटमधील 'मेन्थॉल' हा घटक उच्च प्रतिचा असतो. मज्जासंस्था जागृत करण्याची आणि मेंदूला सतर्क ठेवण्याची त्याची क्षमता अतुलनीय आहे. पेपरमिंट तेल वेदना कमी करण्यास आणि स्नायूंना आराम करण्यास मदत करते. त्याचा नैसर्गिक दाहक-विरोधी गुणधर्म ऍलर्जीमुळे होणारा रक्तसंचय दूर करण्यास मदत करतो. अपचन आणि छातीत जळजळ दूर करण्यासाठी पेपरमिंट तेल उत्कृष्ट आहे.

## लॅव्हेंडर तेल-



शांत, तणावमुक्त, झोप येण्यासाठी मानेच्या बाजूने थोडे पातळ करून लॅव्हेंडर तेल चोळा किंवा खोल श्वास घ्या. उबदार आंघोळीच्या पाण्यामध्ये एक किंवा दोन थेंब देखील टाकू शकता! लॅव्हेंडरचे अद्भुत शांत आणि सुखदायक प्रभाव आहेत आणि ते गाढ झोपेला प्रोत्साहन देते. कीटकांच्या चाव्याव्दारे येणारी खाज आणि जळजळणे थांबवते. वेदना, खाज आणि सूज कमी करण्यासाठी मधमाशीच्या डंखावर, डासांवर किंवा इतर किटक चाव्यावर लॅव्हेंडर तेलाचा वापर करतात. सनबर्नवर तसेच त्वचा भाजलेल्या ठिकाणी लॅव्हेंडर तेल थोडेसे सेंद्रिय कोरफड जेलमध्ये मिसळून त्वचेवर लावले जाते.

## जिरॅनियम तेल-

पोटावर आणि पाठीच्या खालच्या भागावर जिऱ्यानियम



तेलाने मसाज केल्यास पेटके, स्नायूंचा ताण कमी होण्यास मदत होईल आणि शारीरिक विश्रांतीस प्रोत्साहन मिळेल. जेव्हा वेदनादायक मूळव्याधीचा त्रास होतो तेव्हा एक चमचे खोबरेल तेलात एक थेंब जिरॅनियम तेल घालून लावा. घराबाहेर जाण्यापूर्वी त्वचेच्या उघड्या भागात, तसेच पायांच्या आसपास जिरॅनियम तेल लावा. हे तेल यकृत डिटॉक्सिफिकेशन प्रक्रियेसुद्धा मदत करते.

जिरॅनियम तेल एक नैसर्गिक बुरशीविरोधी, antimicrobial आणि antioxidant आहे. त्वचारोग, एक्झिमा, सोरायसिस, तेलकट त्वचा आणि पुरळ यासाठी त्वचेचे टॉनिक, लोशन, मॉइश्चरायझर्स आणि बाममध्ये त्याचा वापर केला जातो. हे तेल चट्टे कमी करण्यास देखील मदत करते.

## लोबान तेल-



ध्यान सहाय्य म्हणून, मनाला शांत आणि केंद्रस्थानी ठेवण्यासाठी, आध्यात्मिक जागरूकता वाढवण्यासाठी आणि ध्यान

करताना आंतरिक शांतीची भावना निर्माण करण्यासाठी लोबान तेल वापरले जाते. हे मज्जासंस्थेला शांत करते. हे एक शक्तिशाली दाहक-विरोधी तेल आहे, ज्यामुळे दमा, क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज, न्यूमोनिया आणि ब्राँकायटिस यांसारख्या श्वसनाच्या समस्यांवर याच्या चांगला उपयोग होतो.

त्वचा कोरडी किंवा तेलकट आणि डागांनी डागलेली असल्यास लोबान तेल उपयोगी आहे. हे तेल त्वचेला घट्ट आणि टॅनिंग करून रेषा तसेच सुरकुत्या कमी करण्यास मदत करते. डाग, त्वचेचे अल्सर आणि जखमा बरे होण्यास गती देते आणि पेशींच्या पुनरुत्पादनास उत्तेजन देते.

संशोधनात असे दिसून आले आहे की तेलातील नैसर्गिक रासायनिक घटक रोगप्रतिकारक शक्तीला उत्तेजित करतात. आवश्यक तेले कधीही गरम करू नका कारण ते गरम केल्याने त्यांचे उपचारात्मक परिणाम कमी होतात.

## नव कृषी संशोधन

द्राक्ष पिकामध्ये समुद्रशैवाळ युक्त जैविक रसायनाचा वापर केल्यास वेलीमध्ये 'सायटोकायनीन'ची पातळी वाढल्याने पाने कार्यक्षम बनतात, अन्ननिर्मितीचा वेग वाढतो. पांढऱ्या मुळांची चांगली वाढ होते. या जैविक रसायनामधील प्रमुख घटक 'अल्जीनिक ॲसिड' हे ऋणभारीत असून त्यातील प्राणवायुमूळे पेशी द्रव्यात मुक्त कॅल्शियमचे प्रमाण जलदरीत्या वाढून पेशीं लवचिक आणि मजबूत होतात.

## संतवचन

कांदा मुळा भाजी । अवघी विठाई माझी ॥
लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ॥
मोट, नाडा, विहिर, दोरी । अवघी व्यपिली पंढरी ॥
-- संत सावता माळी

## माझ्या मनातले....

कुणाला महान म्हणण्यासाठी दुसऱ्या कुणालातरी कमी लेखण्याची गरज नसते. हल्ली सोशल मीडिया वरून हा प्रकार सर्वत्र पाहाण्यात येत असतो! बऱ्याच वेळा याकडे गमतीचा प्रकार म्हणून बघतात पण कळत नकळत एकाला चांगलं म्हणताना दुसऱ्याची निंदा करण्याचा संस्कार होत जातो. जेव्हा कुणी तुम्हाला हिणवत असतं तेव्हा तुम्ही कमी ठरत नसता, तर तसं बोलणाऱ्याचे संस्कार दिसून येत असतात!

डिजिटल तंत्रज्ञानामुळे प्रगतीची दारे निश्चितच खुली झाली आहेत पण या माध्यमाचा दुरूपयोगही होताना दिसत आहे. यामध्ये व्यक्त होण्याच्या स्पर्धेचा वेग अधिक आहे, आपण या माध्यमाद्वारे कशाप्रकारे व्यक्त व्हायला हवं याला कुठही ताळतंत्र राहिलेला नाही ! आपण काय लिहितो, कुठले फोटो आणि कशासाठी अपलोड करत आहोत, कुठल्या विषयावर प्रतिक्रिया देत आहोत आणि का देत आहोत, आपल्याला वादविवाद करायचा आहे का, कशासाठी करावयाचा आहे, त्यातून काय साध्य होणार आहे, याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. विवेक आणि विचारीपणा हा प्रत्यक्षात जीवन जगताना लागतो तसा त्याचा वापर आभासी दुनियेत सुद्धा जरूरी आहे !

संग्राहक- विनायक सिद्धराम उपाध्ये, नाशिक

## सुविचार

दुबळेपणाच्या भिंतीवर कुठलंही शिल्प आकार घेत नाही. त्यासाठी कठीण कातळ हवा असतो आणि शिल्प कोरण्यासाठी हवी असते कामाप्रती निष्ठा, संयमित प्रयत्न आणि दुर्दम्य आशावाद !

# सुगंधी वनस्पती लागवडीच्या संधी आणि उत्पादन प्रक्रिया

प्रा.संजय बाबासाहेब बडे, सहाय्यक प्राध्यापक (कृषी विद्या), दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय
दहेगांव, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर -४२३७०३. मो. ७८८८२९७८५९

आयुर्वेदिक महत्व हे वनस्पतीला मिळालेले निसर्गाचे वरदान आहे. या गुणांची उत्पत्ती त्या झाडात स्वयंनिर्मित झालेली असते. भारतामध्ये फार पूर्वीपासून वनस्पतीच्या विविध भागांचा विशिष्ट रोगांवर उपचार करण्यासाठी वापर करण्यात आलेला आहे. आयुर्वेदिक आणि युनानी यासारख्या भारतीय औषधी प्रलाणीचा वापर अनेक देशांमध्ये वाढत आहे. आयुर्वेदिक औषधी कारखान्यांकडून अशा वनस्पतीयुक्त कच्च्या मालाला तसेच औषधी वनस्पतींपासून बनविलेल्या उत्पादनाला परदेशातील बाजारपेठेत खुप मागणी आहे. औषधी आणि सुगंधी वनस्पतींना असणारी वाढती मागणी ही फायदेशीर शेतीकडे वळणाऱ्या शेतकऱ्यांसाठी एक चांगली संधीच आहे!

## औषधी व सुगंधी वनस्पती लागवडीस वाव

आयुर्वेदाचे महत्व दिवसेंदिवस वाढत असून औषध म्हणून लागवड केल्यास पर्यावरणाचे रक्षण तर होईलच व त्यापासून भविष्यात आर्थिक लाभसुद्धा मिळतील. त्यासाठी औषधीदृष्ट्या महत्व असलेल्या आणि लवकर उत्पादन देणाऱ्या वनस्पतींची लागवड करणे गरजेचे आहे.

या वनस्पतीची व्यापारी तत्वावर लागवड करतांना उत्तम बियाणे, अनुकूल वातावरण व लागवड विषयक तांत्रिक माहिती असणे आवश्यक असते. आयुर्वेदिक औषधी उत्पादनांमध्ये उत्पादनाचा दर्जा व त्यातील रासायनिक घटक द्रव्यांच्या प्रमाणाला आर्थिक महत्व आहे. त्याकरीता उत्तम वाणांचा वापर, वेळेत काढणी करणे योग्य प्रकारे निगा इत्यादी माहिती समजावून घेतल्यास औषधी आणि सुगंधी वनस्पतीची लागवड शेतकऱ्यांना वरदान ठरेल.

## औषधी व सुगंधी वनस्पतीच्या शेतीच्या काही मर्यादा

या वनस्पतींना सर्वसाधारण बाजारपेठेत महत्त्वाचे स्थान दिले जात नाही. प्रामुख्याने याचे ग्राहक औषध कारखानदारच असतात. या कारखानदारांसोबत मागणी करार करून कंत्राटी शेतीद्वारे अशा पिकांची लागवड करणे सुरक्षित असते.

### सुगंधी वनस्पती व त्यामध्ये तेलाचे प्रमाण

| क्र. | सुगंधी वनस्पती | जमीन | वाढीचा प्रकार | वापरावयाचा भाग | तेलाचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | गवती चहा | पोयट्याची रेताड | बहुवार्षीक | पाने | ०.६ ते ०.८ |
| २ | तुळस | पोयट्याची रेताड | बहुवार्षीक | पाने, खोड | ०.२२ ते ०.५५ |
| ३ | पुदिना | पोयट्याची रेताड | बहुवार्षीक | संपुर्ण झाड | ०.४ ते ०.६ |
| ४ | जिरॅनियम | चुनखडी मिश्रीत | बहुवार्षीक | संपुर्ण झाड | ०.८ ते ०.१५ |
| ५ | जावा | पोयट्याची रेताड | बहुवार्षीक | पाने | ०.४ ते ०.६ |

**प्रक्रिया व आयुर्वेदिक उत्पादने :** औषधी आणि सुगंधी वनस्पती बाजारामध्ये प्रक्रिया करून आणाव्या लागतात. प्रक्रिया करण्याच्या पद्धती पुढीलप्रमाणे आहेत. १) साफसफाई करणे/धुणे २) सुकवणे ३) वर्गवारी करणे ४) पावडर/चुर्ण करणे ५) ऊर्ध्वपातन पद्धतीद्वारे सुगंधी तेल काढणे.

## औषधी व सुगंधी वनस्पती संदर्भात महत्वाच्या बाबी

आपल्या भागात येणाऱ्या औषधी आणि सुगंधी वनस्पतींची नावे आणि माहिती करून घेणे. उत्पादन प्रक्रिया करण्यापूर्वी उपलब्ध बाजारपेठ, बाजारभाव तसेच वेळेवर काढणी करण्याची पद्धती माहित असणे गरजेचे आहे.

# लॅव्हेंडर वनस्पती लागवड

डॉ. दर्शना उईके, सहाय्यक प्राध्यापक, वनस्पती रोगशास्त्र, कृषी महाविद्यालय, गडचिरोली. मो. ९४०५८९०५०३



लॅव्हेंडर ही बारमाही वनस्पती आहे. याची फुले अनेक गोष्टींसाठी उपयोगी आहेत. दिसायला हे फुल खूप सुंदर असते. सुगंधामुळे खूप प्रसिद्ध झाले आहे.

या फुलाचे मूळ स्थान हे अरबस्तान आणि रशिया हे ठिकाण मानले जाते. या वनस्पतीची कमाल उंची ३ फूटापर्यंत असते. पाने लांब व अरुंद असतात. वरच्या भागामध्ये फुले येत असतात ही फुले निळ्या व जांभळ्या रंगाची असतात याच्या काही प्रजातींमध्ये पिवळी आणि गुलाबी रंगाची फुले सुद्धा दिसून येतात. लव्हेंडर फुलांपासून स्टीम डिस्टिलेशन पद्धतीने तेल काढले जाते. ह्या झाडाची फुले तेलासाठी प्रसिद्ध आहेत.

झोप येत नसल्यास हे तेल डोक्याला चोळल्याने झोप चांगली झोप लागते. लॅव्हेंडर तेलापासून शाम्पू, साबण, केसाचे तेल इत्यादी उत्पादने बनवतात. या फुलांपासून अत्तर सुद्धा बनविले जाते. या वनस्पतीच्या काही प्रजाती आहेत. उदा. इंग्लिश लॅव्हेंडर, ग्रोसो लॅव्हेंडर, प्रोव्हस लव्हेंडर इत्यादी. यात सर्वात जास्त प्रसिद्ध प्रजातीमध्ये इंग्लिश लॅव्हेंडरचा समावेश होतो.



अनेक देशामध्ये सुगंधी फुलाची मागणी वाढत आहे. त्यामुळे शेतकऱ्याने जर फुलाची शेती सुरु केली तर याचा फायदा नक्कीच चांगला मिळू शकतो. या फुलाची लागवड करायची असल्यास याला तापमान १५-२० अंश सेल्सियसची गरज असते. लव्हेंडर फुलांची योग्य वेळ नोव्हेंबर ते डिसेंबर महिन्यात असते.

### लॅव्हेंडर रोपाची घ्यावयाची काळजी

१) लॅव्हेंडरच्या झाडाला कमी पाणी लागते म्हणून जास्त पाणी देऊ नका.

२) ही वनस्पती उष्णता सहन करू शकते परंतु जास्त पाणी सहन करू शकत नाही. या वनस्पतीला सूर्यप्रकाश खूप आवडतो.

## लॅव्हेंडर चे फायदे

- लॅव्हेंडरचा वापर चहा, कुकीज आणि मिठाई यांसारख्या खाद्यपदार्थांमध्ये तसेच घराच्या सजावटीत केला जातो.
- त्याचा सुगंध खूप आकर्षक असतो, त्यामुळे आजूबाजूचे वातावरण त्याच्या सुगंधाने खूप छान बनते. त्यामुळे परफ्यूम बनवण्यासाठी त्याचा जास्त वापर केला जातो. यासोबतच याच्या तेलाचेही अनेक फायदे आहेत.
- वाळलेली आणि पिशव्यांमध्ये बंद केलेली लॅव्हेंडर फुले कीटकांना प्रतिबंध करतात.
- भूक न लागणे, निद्रानाश (झोप न येण्याची समस्या), रक्ताभिसरणाचे विकार अशा आजारांमध्ये लॅव्हेंडरचा वापर फायदेशीर ठरतो.
- तेलामध्ये अँटीसेप्टिक गुणधर्म असतात. लॅव्हेंडर तेल पेशींच्या वाढीस प्रोत्साहन देते आणि जखमेवरील उपचारांना मदत करते म्हणूनच जखमा आणि जळजळ बरी करण्यासाठी याचा वापर केला जातो.

# कृषी पर्यटन : एक शेतीपुरक व्यवसाय

## (१६ मे 'जागतिक कृषी पर्यटन' दिनानिमित्त विशेष लेख)

**प्रा. संजय बाबासाहेब बडे, सहाय्यक प्राध्यापक (कृषी विद्या), दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय दहेगांव, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर. मो. ७८८८२९७८५९**

**१६ मे हा जागतिक कृषी पर्यटन दिन आहे!** संयुक्त राष्ट्राच्या जागतिक पर्यटन संघटनेकडून मान्यता मिळाल्याने २००९ पासून हा दिवस जागतिक कृषी पर्यटन दिवस म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना हा व्यवसाय चालू करण्यासाठी खुप मोठी संधी आहे, कारण प्रत्येक गावाची एक वेगळी अशी अंगभूत ओळख असते! स्थळानुसार प्रत्येक ठिकाणच्या नैसर्गिक वातावरणात बदल होत असतो तसेच ठिकाण व हवामानानुसार पिकांची विविधताही बदलत असते! प्रत्येक ठिकाणचा विविध क्षेत्रातील पर्यटन वारसा, सांस्कृतीक सण, उत्सव अशाप्रकारच्या विविध जमेच्या बाजू कृषी पर्यटन व्यवसायासाठी पोषक आहेत.

लोकसंख्येच्या तुलनेत जवळपास ४५ टक्क्याहून अधिक असणाऱ्या शहरवासियांसाठी ग्रामीण व कृषी उद्योजकांना पर्यटन व्यवसाय चालू करण्याची संधी प्राप्त झालेली आहे. कृषी पर्यटन व्यवसायाबाबतची सखोल माहिती शेतकऱ्यांना व्हावी यासाठी महाराष्ट्र शासनाचे कृषी खाते, कृषी विद्यापिठे, कृषी संलग्न शासकीय व निमशासकीय संस्था यासाठी चांगली मदत करू शकतात याबरोबरच शासनाचे पर्यटन महामंडळ (एम.टी.डी.सी.) सारख्या संस्थांची भुमिकाही महत्वाची आहे. शासनाचे उदात्त धोरण व बँकांची सहानूभूती निश्चितच या व्यवसायाच्या भरभराटीस कारणीभूत ठरणार आहे.

शहरी लोकांना ग्रामीण संस्कृतीचा विसर पडला असून त्यांना वेळीच याची जाणिव करून देण्याची गरज निर्माण झाली आहे अशा लोकांना माहिती देण्याचे काम कृषी पर्यटन करणार असून आपल्या पूर्वजांनी जपलेल्या ग्रामीण कृषी संस्कृतीचे दर्शन यांना या माध्यमातून करून देता येईल. खऱ्या अर्थाने अशा जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठीच कृषी पर्यटनाची गरज आहे.

आदर्श कृषी पर्यटन स्थळावर राहाण्याची उत्तम व्यवस्था असावी. फार्म हाऊस निट-नेटके असावे. विशेषत: आरामदायी असावे ! राहाण्यायोग्य कमीत-कमी पायाभूत सुविधा आणि पाण्याची पुरेशी सोय असावी. कृषी पर्यटन स्थळावर झाडांची लागवड मोठ्या प्रमाणावर असावी. तेथील वातावरण नैसर्गीक असावे. कृषी पर्यटन स्थळावर विहिर, पोहण्याचा तलाव अथवा तळे असावे. त्यामध्ये मत्स्य पालन केलेले असावे. कृषी पर्यटन स्थळावर बैलगाडी, जनावरे त्यांचे गोठे इत्यादी सुविधा तसेच शेळी फार्म, इमु पालन, रेशीम उत्पादन, हरितगृह यासारख्या जोडधंद्यात्मक सुविधा असाव्यात. जेवणासाठी स्थानिक पद्धतीचे जेवण असावे त्यामध्ये सकाळी नाष्टा, दुपारी व रात्रीचे जेवण यांचा समावेश असावा. हंगामनिहाय कृषी कार्यक्रमांचे आयोजन केल्यास (उदा. संत्रा महोत्सव, हुरडा महोत्सव) पर्यटक आकर्षित होतील. कृषी पर्यटन स्थळावर अशा प्रकारच्या सेवा सुविधा असल्यास पर्यटक त्यामध्ये सहभागी होऊन त्याचा आनंदही लुटतील.

कृषी पर्यटन स्थळावर ग्रामीण खेळांची सुविधा असावी. आलेल्या पर्यटकांना ग्रामीण संस्कृतीची

ओळख करून देण्यात यावी. यामध्ये ग्रामीण वेशभुषा, कला, हस्तकला, सण, उत्सव, ग्रामीण रूढी परंपरा यांचे दर्शन घडून यावे. त्यांना यामध्ये प्रत्यक्ष सहभागी करून घ्यावे. पर्यटकांना बैलगाडीतून सफर घडवून आणावी. घोड्यावरून फेरफटका मारण्याची सुविधा असावी. पाण्यामध्ये मासेमारी करण्याची संधी त्यांना प्राप्त करून द्यावी. शेतावर फेरफटका मारत असतांना शेतावरील फळे, मक्याची कणसे, ज्वारीचा हुरडा, भुईमुगाच्या शेंगा, ऊस आणि इतर खुप काही रानमेवा त्यांना शेतावर उपलब्ध करून द्यावा. ग्रामीण भागातील प्राण्यांची, पक्ष्यांची ओळख करून द्यावी. पर्यटकांना लोककलेची ओळख होईल अशा कार्यक्रमांचे आयोजन करावे. पर्यटकांना जातांना आठवण म्हणून कृषी पर्यटन स्थळावर खरेदी करण्यासाठी विविध स्टॉल उभारलेले असावेत. त्यामध्ये ग्रामीण भागातील स्थानिक कलावंतांनी तयार केलेल्या वस्तू विक्रीसाठी ठेवता येतील. त्यामुळे स्थानिक लोकांसाठी उद्योग निर्माण होईल, त्यातून त्यांचे अर्थाजन चालेल. या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रेरणा मिळेल व युवा पिढीला कृषी पर्यटनातून रोजगार उपलब्ध होईल. तसेच गावाच्या सामाजिक व आर्थिक विकासाला सुद्धा चालना मिळेल.

**राज्य आणि केंद्र सरकार कडून औषधी व सुगंधी वनस्पती लागवड तसेच प्रक्रिया उद्योगासाठी वनस्पतीनुसार ४० ते १००% प्रोत्साहन अनुदान दिले जाते. सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ (औषधी–सुगंधी वनस्पती लागवड मार्गदर्शन केंद्र) येथे लागवडी पासून प्रक्रियेपर्यंतचे सर्व मार्गदर्शन आणि सहकार्य केले जाते. अधिक माहितीसाठी संबधितानी या केंद्राशी संपर्क साधावा.**

**आपल्या देशात १२ हजार पेक्षा अधिक सुगंधी वनस्पती आढळून येतात, त्यापैकी फक्त २० ते २५ सुगंधी वनस्पती पासून मूल्यवर्धित उत्पादने तयार केली जातात. नैसर्गिक सुगंधी रसायनांची निर्मिती आणि त्यांच्या व्यापाराला कृषी क्षेत्रात महत्वाचे स्थान आहे.**

**गुलाब फुलाला जागतिक स्तरावर खूप मागणी असते. रंग, आकार आणि सुगंध हे त्या फुलाचे प्रमुख आकर्षण असते. या फुलापासून गुलाबपाणी, गुलाबअर्क, अत्तर, गुलकंद अशी मूल्यवर्धित उत्पादने तयार करण्यात येतात. सौंदर्यप्रसाधने आणि खाद्यपदार्थांमध्येही याचा वापर वाढत आहे.**

**निलगिरी तेलाचा उपयोग मच्छरांना पळवून लावणाऱ्या (Mosquito repellent) उत्पादनांमध्ये करतात. शिवाय याच्या तेलाचा उपयोग अत्तर आणि आयुर्वेदिक औषधांमध्ये करतात.**

**मेहंदी चा सणासमारंभामधील उपयोग सर्वांना माहिती आहेच! महिलावर्गामध्ये या वनस्पतीची लोकप्रियता अधिक आहे! मेहंदीच्या फुलांपासून अत्तर तयार केले जाते. कपडे आणि केस रंगविण्यासाठी याच्या पानांचा वापर करतात. त्वचारोग, रक्तविकारावर ही वनस्पती गुणकारी आहे.**

**चंदन वनस्पती पासून तयार करण्यात येणारी विविध मूल्यवर्धित उत्पादने सर्वांच्याच पसंतीची असतात विशेषत: साबण, अत्तर, अगरबत्ती आणि सौंदर्यप्रसाधने तयार करण्यासाठी याचा वापर होतो.**

# ओळखा पाहू मी कोण ?



माझं उगमस्थान दक्षिण पूर्व आशिया व ऑस्ट्रेलिया मानलं जातं. २० ते ३५ सेंटीग्रेड तापमान आणि ४००-१००० मिलीमीटर पावसाळी प्रदेशात माझी वाढ चांगली होते. माझी उंची १० ते ३० फूटांपर्यंत असू शकते. पाने गडद हिरवी, जाड आणि थोडी चकचकीत असतात. माझ्या औषधी गुणधर्मांमुळे सध्या सर्वांचे लक्ष माझ्याकडे वेधले गेले आहे! माझी फळे, पाने, मूळे खूप औषधी असतात. फुले पांढरट रंगाची असून फळांचा आकार थोडा वेडावाकडा असतो. तीन वर्षानंतर उत्पादन मिळण्यास सुरु होते. वर्षभर फुले फळे येतात. दहाव्या वर्षी प्रति झाड प्रति वर्ष ३० किलो पर्यंत उत्पादन मिळते. फळे सुरवातीस हिरवट पोपटी रंगाची असतात. पक्व झाल्यावर त्यांचा रंग पिवळसर पांढरा होतो. फळाला झणझणीत उग्र वास असतो. यात बियांचे प्रमाण खूपच असते.

अहो, माझ्या फळात जीवनसत्व 'क' आणि 'ब' तसेच पोटॅशियम (K), मॅग्नेशियम (Mg) आणि लोहाचे (Fe) चे प्रमाण चांगले असते. तसेच औषधी उपयुक्ततेच्या दृष्टीने Glycoside, Proxeronine, Selenium, Xeronine, amino acids आदि घटक असतात. रक्तदाब नियंत्रणात राहण्यासाठी (Blood pressure regulator) कर्करोग (Cancer) निवारक, रक्तातील कोलेस्ट्रेरॉलची (Cholesterol) पातळी कमी करण्यासाठी, सांधेदुखी (joint pain), आणि मधुमेह (Diabetes) निवारक, ताणतणाव (Stress) कमी होण्यासाठी, यकृताचे आणि त्वचेचे आरोग्य चांगले राखण्याकरिता, रोग प्रतिकारक शक्ती वाढण्यासाठी तसेच जखम भरून येण्यासाठी माझा उपयोग करण्यात येतो.

तसं अजूनही माझ्या व्यवसायीक लागवडीकडे कोणाचं फारसं लक्ष गेलेलं दिसून येत नाही. झारखंड राज्यात मात्र कृषी विभागातर्फे प्रोत्साहनपर माझी लागवड सुरू झालेली आहे. आता माझ्यापासून तयार करण्यात आलेली औषधेही बाजारात मिळू लागली आहेत.

**आता तरी ओळखलंत का मला ?**

अहो मी आहे **नागकुंडा** ! इंग्रजीत मला **"Indian mulberry"** म्हणतात. **'नोनी फळझाड'** म्हणूनही माझी ओळख आहे. हिंदी मध्ये मला **'बरटुंडी'** तर कन्नडमध्ये **'मलीग्यान हन्नू'** म्हणतात. आसामी भाषेत **'नोनी'** आणि बंगालीत **'हुर्डी'** म्हणतात.

माझं शास्त्रीय नांव आहे Morinda citrifolia !

## हसा चकटफू !

**बायकोने भली मोठी रांगोळी काढली आणि मला विचारले - "कशी दिसतेय रांगोळी?" रांगोळी नेमकी बदकाची होती का मोराची हे कळतच नव्हतं म्हणून मी मोठ्या हुशारीने म्हणालो काय सुंदर पक्षी रंगवला आहे!" तर बायको भडकली आणि म्हणाली - "डोळे तपासून घ्या आधी, हत्ती आहे तो!"**

**हात्तीच्या मारी ! काय काय बघावं लागेल देव जाणे !**

## कस्तुरी भेंडी

**उपयोग :** कस्तुरी भेंडीच्या बियापासून सुगंधी तेल निघते त्याला 'मस्क तेल' म्हणतात. या तेलाचा उपयोग तंबाखुला विशेष वास देण्यामध्ये करतात तसेच तेलाचा अत्तर म्हणून उपयोग करण्यात येतो.पान मसाला तयार करण्यासाठी सुद्धा उपयोग होतो.

**जमीन :** कस्तुरी भेंडी लागवडीसाठी जमीनीची निवड करतांना जमीन ही मध्यम, काळी व पाण्याचा उत्तम निचरा होणारी असावी.

**लागवड पद्धत :** कस्तुरी भेंडी सुगंधी वनस्पतीचा हंगाम खरीप असून लागवड ही सऱ्या व वरंब्यामध्ये केली जाते. लागवडीसाठी हेक्टरी ५ किलो बियाणे वापरावे. सरी व वरंब्यामध्ये ४५ से.मी. अंतर ठेवावे.

**खत व्यवस्थापन :** लागवडीच्यावेळी ७५ किलो नत्र, ७५ किलो स्फुरद व ७५ किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे नंतर ४० ते ४५ दिवसांनी ५० किलो नत्र प्रति हेक्टरी व फुलोरा आल्यानंतर २५ किलो नत्र प्रति हेक्टरी देणे गरजेचे आहे.

**आंतरमशागत व पाणी वापर :** उभ्या पिकांत तण नियंत्रणासाठी तणांची अवस्था पाहून एक खुरपणी व एक दोन कोळपणी करून पीक तणमुक्त ठेवावे. पाऊस कमी पडल्यास पाणी द्यावे.

**काढणी व्यवस्थापन :** ७५ दिवसांनी फळे काळसर दिसायला लागली की काढणी करावी.

**उत्पादन :** बियांचे ६ ते ८ क्विंटल उत्पादन योग्य नियोजनातून मिळते.

## दुनियादारी !

**आयुष्यात कोणतीच गोष्ट कधी कायमची नसते. एकतर तिचा *काळ* संपून जातो.. किंवा आपली *वेळ* तरी संपून जाते !**

# आरसीएफ शुभदा

**सूक्ष्म अन्नघटक मिश्रणयुक्त खत उत्पादन**
(Microntrients Mixture fertilizer)




**आपण आपल्या शेती व्यवसायात 'आरसीएफ शुभदा' सूक्ष्म अन्नघटक मिश्रणयुक्त खताचा वापर केला आहे का? असल्यास याबाबतचा आपला अभिप्राय–**

.....................................................

.....................................................

.....................................................

.....................................................

.....................................................

.....................................................

## मास पंचांग

**मे – २०२३**
**वैशाख/ज्येष्ठ शके १९४५**

| | | |
|---|---|---|
| सोमवार | ०१.०५.२०२३ | महाराष्ट्र दिन |
| शुक्रवार | ०५.०५.२०२३ | बौध्द पौर्णिमा |
| मंगळवार | १६.०५.२०२३ | जागतिक कृषी पर्यटन दिन |
| सोमवार | २२.०५.२०२३ | जागतिक जैव विविधता दिन |
| रविवार | २८.०५.२०२३ | स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती |



## शेतीपत्रिका सभासद अर्ज

शेतकऱ्याचे पूर्ण नाव – ..................................
..................................................
मुक्काम – ..........................................
पोस्ट – ................ तालुका – ....................
जिल्हा – ...........................................
पोस्ट पीन कोड – ☐☐☐☐☐☐
मोबाइल क्रमांक – ...................................
इ–मेल आयडी – .....................................
e-mail ID (असल्यास)
जन्म तारीख – .......................................
वय – .................. शिक्षण – .....................
शेती पत्रिका सभासद असल्यास रॅपरवरील क्रमांक लिहा –
MH-M ☐ - ☐☐☐☐☐☐

नवीन सभासद होण्यासाठी इथे खूण ☑ करा – ☐

आरसीएफ शेती पत्रिकेबाबतचा आपला अभिप्राय –
..................................................
..................................................
..................................................
..................................................
..................................................

–: सदर अभिप्राय पाठविण्यासाठीचा आमचा पत्ता :–
उप महाव्यवस्थापक (सीआरएम विभाग)
राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड
प्रियदर्शिनी, ८ वा मजला, पूर्व द्रुतगती महामार्ग
सायन, मुंबई–४०००२२

e-mail : crmrcf@gmail.com
दूरध्वनी क्र. ०२२–२५५२३०२२

कृपया सदर अभिप्राय पोस्टाने पाठवा किंवा पाकिटामध्ये घालून आपल्या नजीकच्या आरसीएफ कार्यालयामध्ये द्या. सदर मजकूर पोस्ट कार्डावर लिहून अथवा स्कॅन करून इ–मेलद्वारेही पाठवू शकता.
(शेतीपत्रिका नवीन सदस्यत्वासाठी
आणि सभासद नुतनीकरणासाठी हे आवश्यक आहे.)
शेतकऱ्यांसाठी हे मासिक निशु:ल्क आहे.

## सुजला १९:१९:१९

(पान नं. १४ वरून पुढे...)

फुलधारणेनंतर एक आठवड्याने अशा तीन फवारण्या कराव्यात.

✻ भाजीपालावर्गीय पिकांसाठी २० दिवसांच्या अंतराने आणि अंतिम कापणी पर्यंत फवारणी करावी.

✻ हरितगृहातील फूलपिके, भाजीपाला तसेच रोपवाटिका आणि परसबाग पिकांसाठी आठवड्यातून एक वेळा किंवा आवश्यकतेनुसार अंतिम कापणी पर्यंत २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

फळबागवर्गीय पिकासाठी (उदा. केळी, डाळिंब, आंबा, लिंबू, पेरू इत्यादी) फुले येण्याअगोदर एक आठवडा, फुलधारणेनंतर एक आठवड्याने व फळधारणेच्या वेळेस अशा तीन फवारण्या कराव्यात.

✻ सर्वसाधारण पानांवरील फवारणीसाठी हे खत ५ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात वापरावे. ठिबक सिंचनाद्वारे देताना १ किलो सुजला प्रति २०० लिटर पाणी प्रति एकर क्षेत्र या प्रमाणात वापर करावा. खत सकाळ किंवा सायंकाळच्या वेळेस द्यावे.

### पानांवरील फवारणी करताना घ्यावयाची काळजी

१) पाऊस असताना किंवा हवेची तीव्रता अधिक असल्यास फवारणी करू नये. २) फवारणीसाठी द्रावण तयार करताना पाण्याचा सामू (PH) तपासून घ्यावा. जरूरत भासल्यास 'आरसीएफ पाणी पीएच बॅलन्सर'चा उपयोग करावा. ३) फवारणी हवेच्या आणि स्प्रे पंप नोझल पानांच्या दिशेने ठेऊन दवबिंदुच्या स्वरूपात करावी.

आरसीएफच्या वतीने ट्रॉम्बे–मुंबई येथील सयंत्रात वरील ग्रेड व्यतिरिक्त १३:४०:१३ (ठिबक सिंचन साठी) या ग्रेडची सुद्धा निर्मिती केली जाते. तसेच आयातित १२:६१:००, १३:००:४५, ००:५२:३४, आणि ००:००:५० या ग्रेडचे विपणन केले जाते.

शेती पत्रिकेत प्रसिद्ध होत असलेल्या लेखांत जी मते व्यक्त केली आहेत ती संबंधित लेखक–लेखिकांची आहेत. त्या मतांशी व्यवस्थापन सहमत असेलच असे नाही.
– संपादक, आरसीएफ शेती पत्रिका.

# जपणूक आमची, सामाजिक बांधीलकीची...

## विपणन वार्तापत्र – जिल्हा सांगली




### शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम

आरसीएफ जिल्हा कार्यालय सांगली, कृषी विज्ञान केंद्र, कांचनपूर आणि हिंदुराव पाटील (नाना) विकास सोसायटी, येडेनिपाणी यांच्या संयुक्त विद्यमाने 'शेतकरी प्रशिक्षण' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. (गाव – येडेनिपाणी, तालूका – वाळवा, जिल्हा – सांगली.) डॉ. प्रकाश हिंदुराव पाटील (संचालक), श्री. रायसिंग पाटील (अध्यक्ष), श्री. प्रकाश यादव (उपाध्यक्ष) श्री. योगेश वेंगुर्लेकर (क्षेत्रीय प्रभारी, आरसीएफ कोल्हापूर), श्री. एस.व्ही. राजेशिर्के, उप प्रबंधक (सीआरएम) श्री. अजित संकपाळ (जिल्हा प्रभारी सांगली) कार्यक्रमाला उपस्थित होते. श्री. शैलेश पाटील (कृषी विज्ञान केंद्र, कांचनपूर) यांनी माती परीक्षणाच्या महत्वाविषयी माहिती दिली, श्री. हेमंत गुरसाळे (शेतकरी प्रशिक्षण केंद्र, अलिबाग) यांनी कृषी उत्पादन वाढविण्यासाठी खतांचा संतुलित वापर याबद्दल मार्गदर्शन केले. श्री. विलास जाधव यांनी शेतकऱ्यांना ऊस लागवड, पद्धती, रोग कीड, तसेच खत व्यवस्थापन वेळापत्रकाबद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमासाठी सुमारे १५५ प्रगतिशील शेतकरी उपस्थित होते.

### माती परीक्षण दिन



जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आरसीएफ जिल्हा कार्यालय सांगली यांच्या वतीने मौजे सिर्शी, तालुका– शिराळा येथे माती परीक्षण दिन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. सरपंच श्री.एम.बी. भोसले यांनी अध्यक्षस्थान भूषविले. भूमी परीक्षणतज्ञ श्री. संपत काटकर यांनी माती परीक्षणाचे महत्व शेतकऱ्यांना समजावून दिले. यावेळी शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतजमिनीचे ९५ माती नमूने आरसीएफ प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी दिले. हा कार्यक्रम सविता माने अध्यक्ष, प्रभात ग्राम संघ, कृषी सुविधा केंद्र प्रतिनिधी श्री. अजय पाटील, श्री. विशाल कोळी आणि स्नेहल पाटील यांनी आयोजित केला होता. कार्यक्रमामध्ये महिला शेतकऱ्यांची विशेष उपस्थिती होती.

### शेतकरी सभा



मौजे सुरुल तालुका – वाळवा येथे आरसीएफ जिल्हा कार्यालय सांगली आणि कृषी विभाग यांच्या वतीने शेतकरी सभेचे आयोजन करण्यात आले होते. श्री. सुरेंद्र व्ही. राजेशिर्के उप प्रबंधक (सीआरएम) यांनी शेतकऱ्यांना पीक उत्पादन वाढीमध्ये सूक्ष्म अन्नघटकांचे महत्व, विद्राव्य खत सुजला १९:१९:१९ आणि माइक्रोला खत पद्धतीचा वापर तसेच माती परीक्षण संदर्भात सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमासाठी कृषी सुविधा केंद्र प्रतिनिधी स्नेहल पाटील, ग्रामपंचायत सरपंच श्री. शंकर चव्हाण, कृषी विभाग अधिकारी श्री. रमेश भांबूरे आणि ३५ प्रगतिशील शेतकरी उपस्थित होते.

RNI NO. MAHMAR/2009/32806
Date of Publication 1st of every month. Postal Regd. No. MNE/164/2022-24
Posted at Mumbai Patrika Channel on 10th & 11th of every month






## राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)

नोंदणीकृत कार्यालय : 'प्रियदर्शिनी', इस्टर्न एक्सप्रेस हाईवे, सायन, मुंबई – ४०० ०२२.

वेब साईट : ● www.rcfltd.com ● rcfkisanmanch फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम वर फॉलो करा

आरसीएफ किसान केअर (टोल फ्री क्रमांक) : १८०० २२ ३०४४

हे मासिक मुद्रक व प्रकाशक श्री. नंदकिशोर कृष्णराव कामत यांनी मालक राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लि. मुंबई यांच्यासाठी मे. प्रिंट प्लस प्रा.लि., २१२, स्वस्तिक चेंबर्स, एस.टी. रोड, चेंबूर, मुंबई ४०००७१. येथे छापून राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लि. प्रियदर्शिनी, आठवा मजला, इस्टर्न एक्सप्रेस हाईवे, सायन, मुंबई – ४०० ०२२ येथे प्रकाशित केले.

संपादक : श्री. नंदकिशोर कृष्णराव कामत RNI NO. MAHMAR/2009/32806

यह मासिक मुद्रक एवं प्रकाशक मा. श्री. नंदकिशोर कृष्णराव कामत इन्होने मुंबई, इनके लिए मे. प्रिंट प्लस प्रा.लि., 212, स्वस्तिक चेंबर्स, एस.टी. रोड, चेंबूर, मुंबई 400071. यहाँ मुद्रित करके राष्ट्रीय केमिकल्स एण्ड फर्टिलाइजर्स लि. प्रियदर्शिनी, आठवी मंजिल, इस्टर्न एक्सप्रेस हाईवे, सायन, मुंबई – 400 022 यहाँ से प्रकाशित किया।

संपादक : श्री. नंदकिशोर कृष्णराव कामत RNI NO. MAHMAR/2009/32806

CRM, RCF